Exh No. 13/D

रे.क.नं. 39/2026

मे. सिव्हिल जज्ज ज्युनिअर डिव्हिजन, कागल
यांचे कोर्टात...

सौ. पिरासो नायकवडी —— वादी

वि.

मिरासाब नायकवडी —— प्रतिवादी

यांतील वादीतर्फे अर्ज असा की,

प्रस्तुतचे कामी आज रोजी काही कागदपत्रे हजर करत आहे. ती कागदपत्रे कामाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची असलेने कामी सामिल करुन घेणे गरजेचे आहे.

Order
----------
Production of the document allowed

सबब विनंती की, प्रस्तुतचे कामी कागदपत्रे हजर करणेस परवानगी मिळावी.

ता. 18/03/2026

मे. ता. कळावे

(वादीतर्फे ॲड.)

रे.क.नं. 39/2026

वायचळ, जयसिंगपूर (२२६३१५)

कज्जा नंबर

मे. सिव्हिल जज्ज ज्युनिअर डिव्हिजन, कागल यांचे कोर्टात

पै. पिरासो नायकवडी } वादी

मिरसाब नायकवडी } प्रतिवादी

Exh No. 14/D

दावा रुपये

## कागद यादी

वादी तर्फे कागद हजर केल्याची यादी

| अ.नं. | दस्ताचे वर्णन | दस्ताची तारीख | शेरा |
| --- | --- | --- | --- |
| 1 | वादी यांनी उपअधिक्षकसो तालुका निरिक्षक, कागल यांना केलेला अर्ज | 9/3/26 | स्थळप्रत |
| 2 | पिरासो नायकवडी (वादीचे वडील) यांनी मा. मंत्री महोदय, महसूल व वन विभाग मुंबई यांचे कोर्टात रिव्हिजन अर्ज नं. 640/2025 च्या कामातील अर्ज | 25/4/25 | झेरॉक्स |
| 3 | मे. सिव्हिल जज्ज ज्युनि. डिव्हिजन, कागल यांचे कोर्टात प्रतिवादी यांनी वादी यांचेविरुद्ध दाखल केलेल्या रे.क.नं. 189/2024 च्या दाव्याचे समन्स | 25/10/24 | झेरॉक्स |
| 4 | अन्यप्र-2023/प्र.क्र.80/ज-1अ चे महसूल व वन विभाग महाराष्ट्र शासन चे परिपत्रक | 7/8/23 | झेरॉक्स |

येणे प्रमाणे कागद (4) कागद आहेत. हजर केले आहेत. ता. 18/3/26

Order
--------
Filed.

प्रति,

उपअधिक्षकसो तालुका

निरिक्षकसो कागल.

ता. कागल जि. कोल्हापूर

संदर्भ :- मौजे शेंडूर येथील सि.स.नं 652, 653 ला फेरफार नंबर 921 ने कमी केलेली नोंद रद्द करणेबाबत...

अर्जदार :- सरदार पिरासो नायकवडी मो. नं. 7709038009
रा. शेंडूर ता. कागल जि. कोल्हापूर

महोदय,

मी उपरोक्त गावचा कायमचा रहिवाशी आहे. माझी व माझे सख्खे चुलत बंधू मिरासाब बाबु नायकवडी व पापालाल बाबु नायकवडी यांचे वडीलार्जीत मालकी व कब्जे वहिवाटीचे मौजे शेंडुर येथे सि.स.नं 652 क्षेत्र 476.2 चौ.मी टेन्युअर क" व सि.स.नं. 653 क्षेत्र 106 चौ.मी टेन्युअर क" अशा दोन मिळकत आहेत.

माझे वडील पिरासो हसन नायकवडी हे परवा ता. 11/09/2025 रोजी मयत झाले आहेत. संपूर्ण दोन्ही मिळकतीमध्ये उत्तरेकडील ½ हिस्सा म्हणजे 8 आणे वडीलार्जीत अशी मालकी हक्काणे कब्जेवहिवाटीस आहेत. तर दक्षीणेकडील मिळकत ½ हिस्सेची माझे चुलत बंधु पापालाल व मिरासाब यांचेकडे आहे. माझे हिस्सेचे मिळकतीबाबत मा. अधिक्षकसो जिल्हाभूमी अभिलेख कोल्हापूर यांचेकडे क्र.न.भू. एस. आर 621/2019 चे अपिल चालून दोन्ही मिळकतीच्या उतारेवरती 8 आणे हिस्सेने नाव नोंद करणेचा आदेश झाला. व फेरफार नंबर- 704 मंजुर झाला त्यानिर्णयाविरुध मे. उपसंचालकसो पुणे यांचेकडे अपिल एस.आर. नं 5861/22 झाले ते मंजुर झाले. परंतु सदर निर्णयाविरुध माझे वडील हयात असताना आम्ही मा. मंत्रीमहोदय मुंबई येथे रिव्हि अर्ज नंबर 640/2025 येथे ता. 25/04/2025 रोजी अपिल दाखल केले आहे. सदरचा अर्ज प्रलंबित असताना कोणतेही अंमलबजावणी करणेची नाही. असा महा. शासनाचा जी. आर असतानाही आपले कार्यालयाकडून निर्णयाचा चुकीचा अर्थ काढून माझे वडीलार्जीत मालकीची ½ हिस्सेची मिळकत असून सुध्दा फेर फार नंबर 921 ने ता. 11/02/2026 रोजी ½ (8 आणे ) हिस्सेची नोंद रद्द केली आहे. सदरची कमी केलेली नोंद मुलतः चुकीची व बेकायदेशीर आहे. ती नोंद मा. उपसंचालकसो पुणे यांचे निर्णयास धरुण नाही कारण या पुर्वीचे सि. सर्व्हेचे उतारे अवलोकन केल्यास पिरासो हसन नायकवडी 8 आणे हिस्सेने वडीलार्जीत अशी नोंद आहे. कोणतीही स्थानीक चौकशी व प्रकरणाची शहानिशा न करता केलेला फेरफार नंबर 921 ची नोंद रद्द होणे कायदेशीर आहे. सबब विनंती की.

माझे वडील मयत झाले असलेने दोन्ही सि.स.नंबर 652,653 च्या अखिव पत्रीकेवर मंजुर फेरफार क्रमांक 905 ची नोंद कायम ठेवणेत यावी व आर.टी.एस रिव्ही नंबर 640/25 च्या निर्णयापावेता फेरफार नंबर 921 ची नोंद रद्द करणेत यावी ही नम्र विनंती.

DP
6/3/2026
आवक जावक लिपीक
उप अधिक्षक भूमि अभिलेख, कागल

सोबत जोडलेली कादपत्रे :-

1) सि.स.नं 652, 653 चे उतारे
2) क्र.नं.भु.एस. आर 621/2019 चा निर्णय
3) क्र.नं.भु. / अपिल एस आर 5861/22 चा निर्णय
4) आर.टी.एस रिव्हीजन नंबर 640/2025 ची प्रत
5) महा. शासन निर्णय

① रे.क.नं. 39/2026
चे कामी वादीतर्फे
हजर

आर.टी.एस.द्वितीय रिव्हिजन अर्ज नं. ६४० /२०२५

मा. मंत्री महोदय, महसुल व वन विभाग मुंबई यांचे न्यायालयात

जिल्हा – कोल्हापुर

पिरासो हसन नायकवडी -------------- अर्जदार

विरुद्ध

मिरासाब बाबु नायकवडी वगैरे -------------- जाबदार

यातील अर्जदार यांचा अर्ज की,

प्रस्तुत रीव्हिजन अर्ज हा अर्जदार यांनी सलग्न जमाबंदी आयुक्त (नगर भूमापन) पुणे यांचेकडील क्र. न. भु. द्वितीय अपील एस. आर. नं. ५८६१/२०२२ मधील दिनांक २९/१०/२०२४ च्या निर्णयाविरुद्ध केलेला आहे. प्रस्तुत कामातील वाद मिळकत ही वडिलोपार्जित जमीन असुन यातील जाबदार हे वर नमूद निर्णया आधारे वाद मिळकती वर बेकायदेशीररीत्या कब्जा करुन अर्जदार यांना मिळकती मधुन बेदखल करुन कर्ज बोजा, इतर हक्क अथवा त्रयस्त इसमांचा हक्क निर्माण करणेची दाट शक्यता निर्माण झाली आहे, करिता सदर निर्णयाची लवकरात लवकर स्थगिती घेणे आवश्यक आहे, तसे न झालेस अर्जदार हे वयोवृद्ध असुन त्यांचे आर्थिक तसेच मानसिक असे कशानेही न भरून निघणारे असे नुकसान होणार आहे. करिता न्यायहेतूने प्रस्तुत कामाची जलदगतीने सुनावणी व्हावी अशी नम्र विनंती.

येणेप्रमाणे अर्ज असे.

दि. ~~०९~~ 25/०४/२०२५

स्थळ- मुंबई

(अॅड. शिवराज उगदाळे
अर्जदारतर्फे वकील)

लिपिक
मा. मंत्री, महसूल
यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
२५/०४/२५

(2) रे. क्र. नं. 39/2026
चे कामी वादीतर्फे
हजर

PMHKO130015082024_1_1

MHKO13-001508-2024

नमुना क्रमांक २

**दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, कागल.**

6/D

**सौ.प्र.सु.पाटील यांचे न्यायालयात**

**सह दि.न्या.क.स्तर व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,कागल, कागल, कोल्हापुर.**

**नियमित दिवाणी दावा/189/2024**

वादप्रश्नांच्या निश्चितीसाठी समन्स
(आज्ञावली ५, नियम १, ५)

**मिरसाब बाबू नायकवडी वगैरे.०१ वि. पिरासो हसन नायकवडी**

**पुढिल तारिख : 08-11-2024**

प्रति,

(1) **पिरासो हसन नायकवडी**
**शेंडूर, ता.कागल, जि.कोल्हापूर, Kagal, KOLHAPUR, MAHARASHTRA**

ज्याअर्थी **मिरसाब बाबू नायकवडी वगैरे.०१**, यांनी तुमच्याविरुध्द बद्दल दावा दाखल केला आहे; म्हणून, सदर दाव्याचा जबाब देण्यासाठी **08-11-2024** रोजी मध्यान्ह ११ वाजता या न्यायालयात जातीने किंवा ज्यास यथायोग्य सूचना दिलेल्या असून जो दाव्यासंबंधीच्या सर्व महत्त्वाच्या प्रश्नांची उत्तरे देऊ शकेल अशा किंवा अशा सर्व प्रश्नांची उत्तरे देऊ शकणारी व्यक्ती ज्यांच्याबरोबर असेल अशा वकिलामार्फत हजर होण्यासाठी तुम्हाला याद्वारे बोलावण्यात येत आहे [1][आणि उक्त दिवशी तुमच्या बचावाचे प्रतिवादपत्र दाखल करण्याचा आणि तुमचा बचाव किंवा वजावटीची हक्कमागणी किंवा प्रतिहक्कमागणी ज्यांच्यावर आधारलेली असेल असे तुमच्या कब्जात किंवा अखत्यारात असलेले सर्व दस्तऐवज हजर करण्याचा निदेश तुम्हाला याद्वारे देण्यात येत आहे आणि तुमच्या बचावाच्या किंवा हक्कमागणीच्या पुष्टयर्थ पुरावा म्हणून तुम्ही तुमच्या कब्जात किंवा अखत्यारात असलेल्या किंवा नसलेल्या अशा अन्य कोणत्याही दस्तऐवजांवर अवलंबून असाल त्याबाबतीत, तुम्ही, प्रतिवादपत्रासोबत जोडावयाच्या यादीमध्ये अशा दस्तऐवंजांची नोंद केली पाहिजे.]

यापुर्वी नमूद केलेल्या दिवशी तुम्ही हजर न राहिल्यास, तुमच्या गैरहजेरीत दाव्याची सुनावणी होऊन निर्णय देण्यात येईल, याची दखल घ्यावी.

आज **25-10-2024** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

C.J.J.D. Kagal

(3) रे.क.नं.39/24 चे कामी वादीतर्फे हजर

**अर्धन्यायिक प्रकरण- अर्धन्यायिक आदेशांना अंमल देणे तसेच अधिकार अभिलेखात नोंद घेण्यासंदर्भात निर्देश..**

**महाराष्ट्र शासन**

**महसूल व वन विभाग**

**शासन परिपत्रक क्रमांकः अन्याप्र - २०२३/प्र.क्र.८०/ज-१ अ**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक: ०७ ऑगस्ट २०२३

<u>वाचा:-</u>

शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्र. न्यायाप्र-२०२१/प्र.क्र.११६/ज-१अ, दि.१८/०१/२०२२

**<u>प्रस्तावना-</u>**

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ आणि, महाराष्ट्र जमीन महसूल (अपिले, पुनरिक्षण व पुनर्विलोकन) नियम, १९६७ आणि उक्त संहितेखालील अन्य नियमातील तरतूदी या अन्वये प्राप्त अधिकारात जमीन विषयक अर्धन्यायिक प्रकरणे शासन स्तरावर मा. मंत्री (महसूल) / मा. राज्यमंत्री (महसूल) यांचेकडे वेळोवेळी दाखल करण्यात येतात. मा. मंत्री (महसूल) यांचेसमोरील अशा अपील, पुनरिक्षण अर्जावरील सुनावणीच्या वेळी असे निदर्शनास आले आहे की, अपर आयुक्त / उपसंचालक, (भूमि अभिलेख) अथवा सक्षम प्राधिकारी यांनी पारित केलेल्या आदेशास क्षेत्रीय महसूली अधिकारी हे कित्येक महिने अंमल देत नाहीत किंवा अशा आदेशाची उचित नोंद अधिकार अभिलेखात घेत नाहीत. तद्नंतर असे आदेश शासन स्तरावर आव्हानित केल्यानंतर देखील अशा आदेशास क्षेत्रीय स्तरावर अंमल देण्यात आलेला नसतो तसेच अधिकार अभिलेखात यांची नोंद देखील घेतलेली नसते.

मात्र, शासन स्तरावर दाखल अपिल / पुनरिक्षण अर्जावर सुनावणी आयोजित केल्यानंतर आणि सुनावणीची नोटीस सर्व संबंधितांना पाठविण्याकरिता जिल्हाधिकारी कार्यालयास पाठविण्यात आल्यानंतर घाईघाईने अपर आयुक्त / उपसंचालक (भूमी अभिलेख) अथवा सक्षम प्राधिकारी यांनी पारित केलेल्या आदेशास अंमल देण्याची / अधिकार अभिलेखात नोंदी घेण्याची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर करण्यात येते. ही बाब योग्य व न्यायोचित नाही. यानुषंगाने, सर्व महसूली प्राधिकारी व अधिकारी यांना अर्धन्यायिक आदेशाना अंमल देणे तसेच अधिकार अभिलेखात नोंद घेण्यासंदर्भात निर्देश देण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन परिपत्रक:-**

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ आणि त्याखालील नियमान्वये प्राप्त अधिकारात क्षेत्रीय महसूली अधिकारी व प्राधिकारी यांना अर्धन्यायिक प्रकरणी पारीत आदेशास अंमल देणे व त्याची उचित नोंद अधिकार अभिलेखात घेण्याच्या अनुषंगाने पुढील प्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत :-

(१) अपर आयुक्त / उपसंचालक (भूमी अभिलेख) अथवा सक्षम प्राधिकारी यांनी पारीत केलेल्या आदेशास महाराष्ट्र जमीन महसूल संहिता अधिनियम, नियमांतील तरतूदी आणि शासनाने

(4) टे.क.नं. 39/2026
—चे कामी वाचिले
हजर.

वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार विहित कालावधीत अंमल देवून, त्याची उचित नोंद अधिकार अभिलेखात घेण्याची दक्षता यावी.

(२) तसेच, अशा प्रकरणी अपर आयुक्त, उपसंचालक (भूमि अभिलेख) अथवा सक्षम प्राधिकारी यांनी पारित केलेल्या अर्धन्यायिक आदेशाची अंमलबजावणी केली नसल्यास आणि असे अर्धन्यायिक आदेश संबंधितांनी, शासन स्तरावर मा. मंत्री (महसूल) / मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे स्तरावर संबंधितांनी आव्हानित केल्यामुळे त्याबाबतची सुनावणीची नोटीस क्षेत्रीय स्तरावर प्राप्त झाल्यानंतर अशा सुनावणींचे अंतरिम अथवा अंतिम आदेश पारित होईपर्यंत, अपर आयुक्त / उपसंचालक (भूमि अभिलेख) अथवा सक्षम प्राधिकारी यांनी पारीत केलेल्या आदेशास अंमल देण्यात येवू नये. तसेच त्या आदेशाची अधिकार अभिलेखात नोंद घेवू नये. अशा वेळी शासन स्तरावरुन मा. मंत्री (महसूल) / मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे न्यायालयाकडून पारित होणाऱ्या अर्धन्यायिक आदेशाची प्रतिक्षा क्षेत्रीय महसूली प्राधिकारी यांनी करावी.

(३) सदर आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी.

०४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२३०८०७१६१८०५७८१९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SATYANARAYAN SHIVPRASAD BAJAJ

Digitally signed by SATYANARAYAN SHIVPRASAD BAJAJ
Date: 2023.08.07 16:21:36 +05'30'

(डॉ. सत्यनारायण बजाज)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२
२. मा. अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२
३. सर्व विभागीय आयुक्त,
४. जमाबंदी आयुक्त तथा संचालक, भूमि अभिलेख, पुणे
५. सर्व अपर आयुक्त,
६. सर्व उपसंचालक (भूमि अभिलेख)
७. सर्व जिल्हाधिकारी
८. सर्व उप विभागीय अधिकारी
९. सर्व अधिक्षक (भूमि अभिलेख)
१०. सर्व निवासी उपजिल्हाधिकारी
११. सर्व तहसिलदार
१२. सर्व उप अधिक्षक (भूमि अभिलेख)
१३. निवड नस्ती (ज-१ अ)



PRANITA SUHAS PATIL
Digitally signed by PRANITA SUHAS PATIL
Date: 2026.03.27 17:24:41 +0900